# BDC LIBRARY

## News Paper Clipping


## A.Y. 2025-26

कृष्णा एक्सप्रेस

www.krishnaexpress.in

05 Mar 2026 - Page 4 वार - गुरुवार

# ‘जगदंब फोक अख्यान’ची रंगत पारंपरिक वाद्यांच्या नादात प्रेक्षक मंत्रमुग्ध



मल्हारपेठ : पाटण महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी सादर झालेल्या ‘जगदंब फोक अख्यान’ या लोकगीतांच्या कार्यक्रमाने उपस्थित रसिकांची मने जिंकली. ढोलकीचा दणदणाट, हलगीचा कडकडाट, संबळाचा जागर आणि धनगरी ढोलांचा बाज अशा पारंपरिक वाद्यांच्या गजरात सादर झालेल्या या कार्यक्रमाने महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीचा जिवंत आविष्कार घडविला.

कोयना शिक्षण संस्था व रोटरी क्लब पाटण यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या या महोत्सवाचा उद्देश कृषी, आरोग्य, खाद्यभ्रमंती, शेती व विविध बचत गटांच्या माध्यमातून महिला, पुरुष व युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे हा आहे. प्रदर्शनासह सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानीही या महोत्सवात देण्यात येत आहे.दुसऱ्या दिवशी सकाळपासून प्रदर्शन आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी रंग भरला. विशेषत: सिनेअभिनेत्री कल्याणी नंदकिशोर यांच्या ‘खेळ पैठणीचा’ या महिलांसाठी आयोजित कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सायंकाळी सादर झालेल्या ‘जगदंब फोक अख्यान’ने मात्र अक्षरशः प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. गण, गवळण, कै. पट्टे बापुराव यांच्या कवने, तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित गीतांनी वातावरण भारावून गेले. पारंपरिक गोंधळ, जागरण आणि देवीगीते यांच्या सादरीकरणाने कार्यक्रमाला धार्मिक व सांस्कृतिक रंगत लाभली.

या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे कोणतेही इलेक्ट्रॉनिक वाद्य न वापरता पूर्णपणे पारंपरिक वाद्यांच्या साथीने सादरीकरण करण्यात आले. ढोलकी, हलगी, ताशा, टाळ, मृदंग व संबळ यांच्या निनादात उपस्थित महिला-पुरुष, तरुण-तरुणींनी गाण्यांच्या तालावर ठेका धरला. कार्यक्रमाचे संस्थापक-दिग्दर्शक शंकर माथणे सर व विनायक संकपाळ यांनी आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांसह वाद्यवृंद आणि कलाकारांच्या सहकार्या हा कार्यक्रम साकारला.

प्रारंभी कोयना शिक्षण संस्थेच अमरसिंह पाटणकर, संचालक यज्ञसे पाटणकर व विद्यालयाचे प्राचार्य विलार कळंत्रे यांच्या हस्ते ‘जगदंब फोव अख्यान’चे उद्घाटन करण्यात आले पारंपरिक लोककलेचा संगम आणि स्थानिक कलाकारांची दमदार सादरीकरण यामुळे पाटण महोत्सवातील हा दिवस पाटणकरांसाठी अविस्मरणीय ठरला.